मतदार यादीचा अचूक डाटा मिळण्याबाबत धोरण

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ- २०१७/प्र.क्र.१८/संगणक कक्ष
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६/१०/२०१७.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२४ व २४३ के/२४३ झेडए अन्वये "superintendence, direction and control of the preparation of electoral rolls" याची संपूर्ण जबाबदारी स्वतंत्रपणे भारत निवडणूक आयोग व संबंधित राज्य निवडणूक आयोगाची आहे. या तरतुदीनुसार भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग या दोन्हींना मतदार यादी स्वतंत्रपणे तयार करता येते. मात्र, या दोन्ही याद्यांमध्ये तफावत राहू नये व गोंधळाची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी राज्य शासनाने जाणीवपूर्वक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियमात स्वतंत्रपणे मतदार यादी तयार न करता भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली मतदार यादी वापरण्याची तरतूद केली आहे. ह्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यावेळी "विशिष्ट दिनांकास (cut off date)" भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली व अस्तित्वात असणारी विधानसभा मतदार यादी वापरण्यात येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता "विशिष्ट दिनांकास" अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करण्यात येते.

२. मतदार यादी तयार करण्याच्या नियमानुसार मतदारांनी दिलेल्या अर्जावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा मतदार नोंदणी अधिकारी यांचा असतो. मतदार यादी अद्ययावत व बिनचूक करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून निर्गमित झालेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रत्येक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी एक कालबध्द पध्दतीने काम करणे अपेक्षित आहे. जर त्यांनी कालबध्द पध्दतीने कार्यवाही केली नसेल तर त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करता येते.

३. राज्य निवडणूक आयोगाने २०१५ पासून विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन संगणकाच्या सहाय्याने करण्यास सुरुवात केली असून, अशा प्रकारचे विभाजन अत्यंत उपयुक्त ठरलेले आहे. यामुळे वेळेचा अपव्यय तसेच होणाऱ्या चुका कमी झालेल्या आहेत. मात्र, त्यामध्ये अजूनही काही अडचणी येत आहेत. उदा :-

(i) राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या Cut off date साठी कोणती मतदार यादी ग्राह्य धरावयाची आहे?

(अ) ERMS (Electoral Roll Management System) सॉफ्टवेअरमध्ये Cut off date रोजी समाविष्ट झालेल्या नावांची यादी, किंवा

(ब) Cut off date रोजी पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व अर्जांवर निर्णय होऊन तयार होणारी यादी, इत्यादी.

(ii) मतदार नोंदणी अधिकारी यांनी Cut off date च्या किती दिवस अगोदर प्राप्त झालेल्या अर्जांवर निर्णय घेऊन ERMS मध्ये नोंद करणे आवश्यक आहे?

(iii) Cut off date नंतर किती दिवसांच्या आत मुख्य निवडणूक अधिकारी यांनी Cut off date ची मतदार यादी राज्य निवडणूक आयोगास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे?

(iv) विधानसभा मतदार यादीचा सॉफ्ट डाटा काही वेळा विलंबाने प्राप्त होणे.

४. गेल्या २-३ वर्षांमध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यावेळी मतदार याद्यांबद्दल अनेक न्यायालयीन प्रकरणे दाखल झालेली आहेत. या प्रकरणांमध्ये मा. उच्च न्यायालयाने जरी मतदार यादी वैध धरली असली तरी ही मतदार यादी बिनचूक व अद्ययावत कशी करता येईल याबाबत आयोगाने (दोन्ही भारत व राज्य) व शासनाने सर्व उपाययोजना करावी, अशा प्रकारचे आदेश पारित केलेले आहेत. यासंदर्भात दिनांक ८/६/२०१७ रोजी मा. मुख्य सचिव व दिनांक ८/९/२०१७ रोजी मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याबरोबर झालेल्या बैठकीमध्येसुध्दा या विषयी चर्चा करण्यात आली होती.

५. वरील वस्तुस्थिती व मा. मुख्य सचिव तसेच मुख्य निवडणूक अधिकारी यांचे समवेत झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कोणती मतदार यादी ग्राह्य धरावयाची खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

**आ दे श**

६. राज्य निवडणूक आयोगाने ज़ाहीर केलेल्या विशिष्ट दिनांकास (Cut off date) / अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येते. म्हणून मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली -

- "मूळ यादी (Mother Roll) +
- सर्व प्रसिध्द पुरवण्या +
- Cut off date रोजी ERMS मध्ये ERO द्वारे स्वीकृत झालेल्या मतदारांची यादी (फॉर्म-६, ७, ८ व ८अ धरुन)"

विशिष्ट दिनांकास (Cut off date) अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

७. वरील यादी मुख्य निवडणूक अधिकारी यांनी विशिष्ट दिनांकाच्या दुसऱ्या कामाच्या दिवशी राज्य निवडणूक आयोगास उपलब्ध करून द्यावी.

८. निर्णय झालेल्या सर्व अर्जांची Cut off date पर्यंत ERMS मध्ये नोंदणी करण्याची सर्व जबाबदारी मतदार नोंदणी अधिकारी (ERO) यांची राहील. त्यासाठी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आवश्यक ती सर्व उपाययोजना करावी.

९. जे मतदार नोंदणी अधिकारी योग्य कारणाशिवाय नियमाप्रमाणे वेळेवर निर्णय घेणार नाहीत व ERMS मध्ये नोंद घेणार नाहीत त्यांच्याविरुध्द तक्रारी प्राप्त झाल्यास राज्य निवडणूक आयोगाकडून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

१०. ERMS मध्ये Cut off date रोजी दिसणाऱ्या मतदार यादीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही. त्यासाठी कोणत्याही मतदार नोंदणी अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांनी पुरेशा कारणाशिवाय राज्य निवडणूक आयोगास थेट विनंती करू नये. चूक दुरुस्त करणे आवश्यक असेल तर मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या शिफारशींसह त्यांनी राज्य निवडणूक आयोगास लेखी स्वरुपात कळवावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(शेखर चन्ने)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-
१. जिल्हाधिकारी, सर्व
२. महानगरपालिका आयुक्त, सर्व
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व
४. मुख्याधिकारी, सर्व